२१

माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांची सामाजिक आर्थिक परिस्थिती, संपादन प्रेरणा आणि शैक्षणिक संपादन यातील सहसंबंधाचा अभ्यास

संशोधक
भालचंद्र आर पाटील,
विद्यावाचस्पती विद्यार्थी,
शिक्षणशास्त्र विभाग, मुंवई विद्यापीठ

मार्गदर्शक
डॉ. सुनिता मगरे,
विभाग प्रमुख तथा सहयोगी प्राध्यापक,
शिक्षणशास्त्र विभाग, मुंवई विद्यापीठ

सारांश

शिक्षणाच्या माध्यमातूनच विद्यार्थ्यांच्या विविध क्षमतांचा विकास साधला जात असतोआणि त्यातून त्यांच्यात विविध कौशल्यांचा विकास होतो वत्यांचे जीवन गतिमान होत असते. सामाजिक गुणांचा विकास, नागरिकत्व व राष्ट्रीयत्व आणि चारित्रयसंवर्धन या सर्व बाबींचा विकास विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाद्वारेच होत असतो. व्यक्तिगत तसेच समाज विकासात शिक्षण महत्वाची भूमिका बजावते. त्यासाठी विद्यार्थ्यांना शालेय जीवनात त्यांच्या कुटुंबाकडून योग्य ते पाठबळ मिळणे खूप आवश्यक असते, यासाठी पालकांची सामाजिक आर्थिक परिस्थिती विद्यार्थ्याचा शिक्षण प्रवाह ठरविणारा महत्वाचा घटक ठरतो, आणि आज याचे चित्र आज आपणास पहावयास मिळते. चांगली आर्थिक परीस्थिती असलेल्या पालकांच्या मुलांना शिक्षणाच्या चांगल्या संधी उपलब्ध होतात तशा इतर विद्यार्थ्यांना त्या मिळत नाहीत,म्हणून प्रस्तुत संशोधनात राज्य मंडळाशी सलग्नीत माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची सामाजिक आर्थिक परिस्थिती, संपादन प्रेरणा आणि शैक्षणिक संपादन यातील सहसंबंधांचा अभ्यास केलेला आहे. संशोधन नमुन्यात नंदुरबार जिल्हयातील माध्यमिक शाळांमधील ४९३ विद्यार्थ्यांचा समावेश होता, यात १८९ मुले आणि ३०४ मुलींचा समावेश होता. सदर संशोधनात वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केलेला आहे. प्राप्त माहीतीचे विश्लेषण करण्यासाठी केंद्रिय प्रवृत्ती व विचलनशीलतेची परिमाणे तसेच 'टी' परिक्षिका, सहसंबंध गुणक, या सांख्यिकी तंत्रांचा वापर केला होता.संशोधनाअंती असे आढळून आले की, उच्च सामाजिक आर्थिक परिस्थिती व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनात, संपादन प्रेरणेत लक्षणिय फरक आहे. तसेच उच्च संपादन प्रेरणा व निम्न संपादन प्रेरणा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनात लक्षणिय फरक आढळून आला.

प्रस्तावना

सर्वात जास्त यशस्वी शिक्षण पध्दती तीच असते, की जी समता आणि गुणवत्ता या पायावर उभी असते आणि समाजातील सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देते. जे विद्यार्थी त्यांचे शिक्षण पूर्ण करू शकत नाहीत किंवा त्यांच्यात अपेक्षित कौशल्यांचा विकास झालेला नसतो, त्यांना कमी उत्पन्नाची साधने उपलब्ध होतात किंवा बेरोजगारी सारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. पर्यायाने याचा त्यांच्या सामाजिक

जीवनावर, त्यांच्या मुलांच्या शैक्षणिक संधी यावर सुध्दा प्रतिकूल परीणाम होतो. कुरेशी आणि शाहयांनी केलेल्या संशोधनात (२०१२) यांना असे आढळले की, विद्यार्थ्याच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती ही विद्यार्थ्याच्या शाळेच्या बाहेरील व शाळेच्या आतील जीवनावर खूप मोठा प्रभाव टाकते आणि हा प्रभाव विद्यार्थ्याच्या शिकण्यावरही असतो. म्हणून आर्थिकदृष्टया वचित गटातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणात समान संधी मिळाव्यात यासाठी विविध तरतुदी केल्या गेल्या आहेत, यामागील प्रमुख तत्व म्हणजे समाजातील सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणेहोय.

प्रत्येक व्यक्ती ही जन्मल्यापासून शिकतच असते. कुटुंब, भोवतालचा परिसर,समाज व मित्रपरिवार अशा विविध औपचारिक अनौपचारिक माध्यमातून शिक्षण सुरू असते. पण त्याचेखरे औपचारीक शिक्षण सुरू होते ते शाळेत आल्यावर आणि या शिक्षणप्रक्रियेतील विद्यार्थ्याची यशस्वीता ही विविध घटकांशी संबंधित असते, यात विद्यार्थ्यांची बुध्दिमत्ता, त्याची आवड, पालकांचा सामाजिक आर्थिक दर्जा,पालकांचा शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन, शाळेचा दर्जा यासह अनेक बाबींचा समावेश होतो. आणि यातील महत्वाचा घटक म्हणजे विद्यार्थ्याचे कुटुंब, कारण विद्यार्थी शाळेनंतर सर्वाधिक वेळ त्याच्या घरी घालवत असतोत्यासाठी विद्यार्थ्यांना शालेय जीवनात त्यांच्या कुटुंबाकडून योग्य ते पाठबळ मिळणे खूप आवश्यक असते, यासाठी पालकांची सामाजिक आर्थिक परिस्थिती विद्यार्थ्याचा शिक्षण प्रवाह ठरविणारा महत्वाचा घटक आहे, आणि आज याचे चित्र आज आपणास पहावयास मिळते. चांगली आर्थिक परीस्थिती असलेल्या पालकांच्या मुलांना शिक्षणाच्या चांगल्या संधी उपलब्ध होतात तशा इतर विद्यार्थ्यांना त्या मिळत नाहीत, म्हणून प्रस्तुत संशोधनात राज्य मंडळाशी सलग्नीत माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची सामाजिक आर्थिक परिस्थिती, संपादन प्रेरणा आणि शैक्षणिक संपादन यातील सहसंबंधांचा अभ्यास केलेला आहे.

सांबंधित साहीत्याचा आढावा

आनंद एस.पी. (१९८९) यांनी केलेल्या संशोधनात, विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य आणि त्यांचे शैक्षणिक संपादन आणि पालकांची शैक्षणिक व व्यावसायिक स्थिती यात धनात्मक सहसंबंधआढळून आला.

सॅम्युएल्स आणि स्मिथ (१९९०) यांनी केलेल्या संशोधनात, ज्या विद्यार्थ्यांचा सर्वसमावेशक आरोग्य कार्यक्रमात सहभाग होता, त्यांची धारणाशक्ति आणि शैक्षणिक संपादन, सर्वसमावेशक आरोग्य कार्यक्रमातसहभाग होता, त्यांची धारणाशक्ति आणि शैक्षणिक संपादन, सर्वसमावेशक आरोग्य कार्यक्रमात सहभाग नसलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा अधिक चांगले आढळून आले.

हरीकृष्णा, एम. (१९९२) यांनी शैक्षणिक संपादन आणि संपादनप्रेरणा व सामाजिक आर्थिक परिस्थिती यातील संहसंबंधाचा अभ्यास केला. सदर संशोधनात त्यांनी एकूण ३00 विद्यार्थ्यांची यादृच्छिक पध्दतीने निवड केली होती. संशोधनांती असे आढळून आले की, मुलांपेक्षा मुलींचे शैक्षणिक संपादन अधिक आढळून आले, शैक्षणिक संपादन आणि सामाजिक आर्थिक परिस्थिती यात लक्षणिय सहसंबंध आढळून आला, आणि शैक्षणिक संपादन आणि संपादन प्रेरणा यात लक्षणिय सहसंबंध नाही.

ट्रॉकल (२000) यांनी केलेल्या संशोधनात, विद्यार्थ्यांच्या आरोग्य वर्तनात त्यांनी विद्यार्थ्यांच्या झोपण्याची आणि सकाळी लवकर उठण्याची वेळ यांचा समावेश केला होता. त्यांना असे आढळून आले की, विद्यार्थ्यांच्या झोपण्याची आणि सकाळी लवकर उठाण्याच्या वेळेचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर खूपच मोठा परिणाम होतो.

व्हर्क्युतेन थीजीस आणि कॅटन (२00१) यांनी नेदरलॅंडमधील तुर्कीश तरफण विद्यार्थ्यांतील संपादन प्रेरणा आणि शालेय कामगिरी यांचा अभ्यास केला.संशोधनांती असे आढळून आले की,विद्यार्थ्यांच्या संपादन प्रेरणेचा योग्य परिणाम त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर दिसतो, विद्यार्थ्यांना लाभलेली कौटुंबिक प्रेरणा त्यांच्या कार्यकुशलतेशी धन संबंधित आहे.

भोईर (२०१0) यांनी आदिवासी शाळांतील विद्याथ्यारंची संपादन प्रेरणा व शालेय वातावरण यांच्या सहसंबंधाचा अभ्यास केला. प्रस्तुत संशोधनांती असे आढळून आले की, संपादन प्रेरणा व शालेय वातावरण यांच्यात लक्षणीय फरक आढळून आला तसेच संपादन प्रेरणा व शालेय वातावरण यांच्या लक्षणीय सहसंबंधआढळूनआला.

संशोधन अभ्यासाची गरज

संबंधित साहित्याच्या सिंहावलोकनातून सूचीत होते की, विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक परीस्थिती, शैक्षणिक संपादन व संपादन प्रेरणा यांच्या सहसंबधांच्या अनुशंगाने फारच अल्प संशोधने झाल्याचे दिसून येते तसेच उच्च व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनातील फरक तसेच उच्च व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांच्या संपादन प्रेरणेतील फरक आणि उच्चव निम्न संपादन प्रेरणा असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनातील फरक अभ्यासण्याच्या अनुशंगाने संशोधन झालेले आढळून आले नाही. संशोधनांमध्ये कालावधीच्या बाबतीत सातत्य आढळून येत नाही. तसेच भारतातझालेल्या विविध संशोधनाच्या निष्कर्षांचा विचार केल्यास, सदर संशोधनास महत्त्व प्राप्त होते कारण विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त वेळ वर्गात आणि घरी जातो, त्यामुळे विद्यार्थ्यांवर घरातील सामाजिक आर्थिक परीस्थितीचाप्रभाव पडतो.म्हणून प्रस्तुत संशोधनात राज्य मंडळाशी सलग्नीत माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची सामाजिक आर्थिक परिस्थिती, संपादन प्रेरणा आणि शैक्षणिक संपादन यातील सहसंबंधांचा अभ्यास केलेला आहे.

संशोधनातील चले

सदर संशोधनात खालील चलांचा समावेश करण्यात आलेला होता.

१) सामाजिक आर्थिक परिस्थिती (Socio economic status)

२) संपादन प्रेरणा (Achievement motivation)

३) शैक्षणिक संपादन(Academic Achievement)

चलांच्या कार्यकारी व्याख्या

१) सामाजिक आर्थिक परिस्थिती — सामाजिक आर्थिक परिस्थिती म्हणजे विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न, त्यांचे शिक्षण, त्यांच्या राहणीमानाचा आणि सामाजिक दर्जा, पालकांचा व्यवसाय याबद्दलची स्थिती होय.

२) संपादन प्रेरणा — विद्यार्थ्यारंना आपले ठरविलेले ध्येय साध्य करण्यासाठी, त्यांच्या वर्तनाला, ध्येय प्राप्तीसाठी योग्य दिशा देणारी एक आतंरीक व बाह्य शक्ती म्हणजे संपादन प्रेरणा होय.

३) शैक्षणिक संपादन — विद्यार्थ्यांचे शैक्षणिक संपादन म्हणजे, विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्षात सहामाही परीक्षेत मिळविलेल्या सर्व विषयातील गुणांची टक्केवारी होय.

संशोधनाची उद्दिष्टे

१) माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक संपादन आणि संपादन प्रेरणेची लिंगानुसार तुलना करणे.

२) माध्यमिक शाळांमधील उच्च व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनाची तुलना करणे.

३) माध्यमिक शाळांमधील उच्च व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांच्या संपादन प्रेरणेची तुलना करणे.

४) माध्यमिक शाळांमधील उच्च व निम्न संपादन प्रेरणा असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिकसंपादनाची तुलना करणे.

५) माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक परिस्थितीचा खालील चलांशी असलेला सहसंबंध अभ्यासणे.

अ) शैक्षणिक संपादन

ब) संपादन प्रेरणा

संशोधनाच्या शून्य परिकल्पना

१) माध्यमिक शाळांमधील मुले व मुलींच्या शैक्षणिक संपादनात लक्षणिय फरक नाही.

२) माध्यमिक शाळांमधील मुले व मुलींच्या संपादन प्रेरणेत लक्षणिय फरक नाही.

३) माध्यमिक शाळांमधील उच्च व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनात लक्षणिय फरक नाही.

४) माध्यमिक शाळांमधील उच्च व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांच्यासंपादन प्रेरणेत लक्षणिय फरक नाही.

५) माध्यमिक शाळांमधील उच्च व निम्न संपादन प्रेरणा असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनात लक्षणिय फरक नाही.

६) माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिकपरिस्थितीत आणि खालील चलांत लक्षणिय सहसंबंध नाही.

अ) शैक्षणिक संपादन

ब) संपादन प्रेरणा

संशोधन पध्दती

संशोधकाने सदर संशोधनात वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केलेला आहेकारण सदर संशोधन हे वर्तमान काळाशी संबंधीत असून यात विद्यार्थ्यांची सामाजिक आर्थिक परिस्थिती, संपादन प्रेरणा, आणि शैक्षणिक संपादन या चंलातील सहसंबंधांचा अभ्यास केला असल्याने वर्णनात्मक संशोधनपध्दतीचा उपयोग केलेला आहे. तसेच संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सहसंबंध पध्दती आणि कारणमीमांसा तुलनात्मक पध्दती उपयोग केला आहे.

संशोधनाचा न्यादर्श

नमुना निवडीसाठी स्तरीत यादृच्छिक नमुना निवड तंत्राचा वापर करून नंदुरबार जिल्हा कार्यक्षेत्रात असणाऱ्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाशी सलग्नीत खाजगी अनुदानित, आदिवासी विभाग आणि समाज कल्याण व्यवस्थापनाच्या माध्यमिक शाळांची यादृच्छिक नमुना निवड तंत्रातील लॉटरी पध्दतीने निवड करण्यात आली आणि त्या संबंधित शाळेतील विद्यार्थ्यांची प्रासंगिक नमुना निवड पध्दतीव्दारे न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली.संशोधनात इयत्ता ९ वी तील, एकूण ४९३ विद्यार्थी की ज्यात १८९ मुले आणि ३०४ मुली यांचा समावेश होता.

संशोधनाची साधने

संशोधकाने संशोधनासाठी प्रमाणित साधनांचा उपयोग केला आहे. विद्यार्थ्यांच्यासामाजिक आर्थिक परिस्थितीचे मापन करण्यासाठी श्री. पटेल यानी तयार केलेल्या प्रश्नावली चा उपयोग केला तसेच विद्यार्थ्यांची संपादन प्रेरणेचे मापन करण्यासाठी श्री. देव मोहन यांची संपादन प्रेरणा पदनिश्चयन श्रेणी चा उपयोगकेला आहे आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनासाठी विद्यार्थ्यांना सहामाही परीक्षेत मिळालेल्या सर्व विषयांच्या गुणांची टक्केवारी घेण्यात आली आहे.

माहितीचे वर्णनात्मक विश्लेषण

सारणी क्रमांक १

माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची सामाजिक आर्थिक परिस्थिती, संपादन प्रेरणा आणि शैक्षणिक संपादनाचे लिंगा नुसार वर्णनात्मक विश्लेषण

चले	लिंग	नमुना	मध्यमान	मध्यांक	बहुलक	प्र.वि.	विषमितता	शिखरदोष
सामाजिक आर्थिक परिस्थिती	मुले	१८९	५२.८९	५१	३४	१७.७७	०.६४४	०.५५
	मुली	३०४	५४.६	५१	४९	१८.३६	१.०९	२.४३
संपादन प्रेरणा	मुले	१८९	१९०.११	१९०	२०१	२२.५४	०.००३	-०.६४
	मुली	३०४	१९२.४२	१९४	१९४	२३.०५	-०.३४	-०.०८
शैक्षणिक संपादन	मुले	१८९	६१.३२	५९	८५	१२.३	०.९५	१.०३
	मुली	३०४	६१.६	६०.३३	६०	१२.७३	०.५८७	०.५१९

वरील सारणी क्रमांक २ मध्ये, मुले व मुली यानुसार, माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांची सामाजिक आर्थिक परीस्थिती, संपादन प्रेरणा व शैक्षणिक संपादन याचलांचे वर्णनात्मक सांख्यिकीचे वितरण, मध्यमान, मध्यगा, बहुलक,विषमितता आणि शिखरदोष या स्वरूपात दिलेले आहे. ऋण विषमितता मूल्य हे वारंवारिता वितरण हे काहीशा प्रमाणात ऋण विषमित असल्याचे दर्शविते तसेच धन विषमितता मूल्य हे वारंवारिता वितरण हे काहीशाप्रमाणात धन विषमित असल्याचे दर्शविते. शिखरदोषाचे धन मूल्य हे प्रसामान्य संभव वक्राच्या तुलनेत वितरण उच्चशिखरी असल्याचे दर्शविते, तर शिखरदोषाचे ऋण मूल्य हे प्रसामान्य संभव वक्राच्या तुलनेत वितरणचर्पटकशिखरी असल्याचे दर्शविते. तसेच खाली आलेख क्रमांक ०१ मध्ये मुले व मुलींच्या सामाजिक आर्थिक परीस्थिती, संपादन प्रेरणा व शैक्षणिक संपादनाच्या मध्यमानांची तुलना दर्शविली आहे.



आलेख क्रमांक ०१ : मुले व मुलींची सामाजिक आर्थिक परीस्थिती, संपादन प्रेरणा व शैक्षणिक संपादनाच्या मध्यमानांची तुलना.

Vol: 7th, Issue : II , English-Marathi, Quarterly: 1st Sep. 2018,ISSN : 2319-5525
UGC Approval No. 63299

अनुमानात्मक विश्लेषण

परीकल्पना क्रमांक १ : माध्यमिक शाळांमधील मुले व मुलींच्या शैक्षणिक संपादनात लक्षणिय फरक नाही.

सारणी क्रमांक २

माध्यमिक शाळांमधील मुले व मुलींच्या शैक्षणिक संपादनाची तुलना

चल	गट	नमुना	स्वा. मात्रा	मध्यमान	प्र.वि.	टी मूल्य	पी मूल्य	सार्थकता स्तर
शैक्षणिक संपादन	मुले	१८९	४९१	६१.३२	१२.३	०.२४५	०.८०६	लक्षणीय फरक नाही
	मुली	३०४		६१.६	१२.७३			

सारणी क्रमांक २ वरून असे लक्षात येते की, माध्यमिक शाळांमधील मुले व मुलींच्या शैक्षणिक संपादनाच्या टी मूल्याची किंमत ०.२४५ असून पीमूल्याची किंमत ०.०५ पेक्षा जास्त आहे, म्हणून माध्यमिक शाळांमधील मुले व मुलीमुलींच्या शैक्षणिक संपादनात लक्षणिय फरक नाही. म्हणून सदर परीकल्पना स्वीकारली आहे.

परीकल्पना क्रमांक २ : माध्यमिक शाळांमधील मुले व मुलींच्या संपादन प्रेरणेत लक्षणिय फरक नाही.

सारणी क्रमांक 3

माध्यमिक भाळांमधील मुले व मुलींच्या संपादन प्रेरणेची तुलना

चल	गट	नमुना	स्वा. मात्रा	मध्यमान	प्र.वि.	टी मूल्य	पी मूल्य	सार्थकता स्तर
संपादन प्रेरणा	मुले	१८९	४९१	१९०.११	२२.५४	१.०९	०.२७	लक्षणीय फरक नाही
	मुली	३०४		१९२.४२	२३.०५			

सारणी क्रमांक ३ वरून असे लक्षात येते की, माध्यमिक शाळांमधील मुले व मुलींच्या संपादन प्रेरणेच्या टी मूल्याची किंमत १.०९ असून पीमूल्याची किंमत ०.०५ पेक्षा जास्त आहे, म्हणून माध्यमिक शाळांमधील मुले व मुलींच्या संपादन प्रेरणेत लक्षणिय फरक नाही. म्हणून सदर परीकल्पना स्वीकारली आहे.

परीकल्पना क्रमांक ३ : माध्यमिक शाळांमधील उच्च व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनात लक्षणिय फरक नाही.

सारणी क्रमांक ४

उच्च व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनाची तुलना

चल	गट	नमुना	स्वा. मात्रा	मध्यमान	प्र.वि.	टी मूल्य	पी मूल्य	सार्थकता स्तर
शैक्षणिक संपादन	उच्च सामाजिक आर्थिक परिस्थिती	२००	४९१	६५.०५	१६.२५	५.३४	०.०००१	०.०१ स्तरावर लक्षणीय फरक आहे
	निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती	२९३		५९.०६	८.४५			

Vol: 7th, Issue : II , English-Marathi, Quarterly: 1st Sep. 2018,ISSN : 2319-5525

UGC Approval No. 63299

सारणी क्रमांक ४ वरून असे लक्षात येते की, उच्च सामाजिक आर्थिक परिस्थिती व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनाच्या प्राप्त टी ची किंमत ५.३४ असून, पी मूल्याची किंमत 0.0१ पेक्षाकमी आहे, म्हणून उच्च सामाजिक आर्थिक परिस्थिती व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनात लक्षणिय फरक आहे. म्हणून सदर शून्य परीकल्पना त्याज्य ठरते.

परीकल्पना क्रमांक ४ : माध्यमिक शाळांमधील उच्च व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांच्या संपादन प्रेरणेत लक्षणिय फरक नाही.

सारणी क्रमांक ५

उच्च व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांच्या संपादन प्रेरणेची तुलना

चल	गट	नमुना	स्वा. मात्रा	मध्यमान	प्र.वि.	टी मूल्य	पी मूल्य	सार्थकता स्तर
संपादन प्रेरणा	उच्च सामाजिक आर्थिक परिस्थिती	२00	४९१	२0२.५८	२१.८६	९.६५	0.0000१	0.0१ स्तरावर लक्षणीय फरक आहे
	निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती	२९३		१८३.९९	२0.३६			

सारणी क्रमांक ५ वरून असे लक्षात येते की, उच्च सामाजिक आर्थिक परिस्थिती व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संपादन प्रेरणेच्या प्राप्त टी ची किंमत ९.६५ असून, पी मूल्याची किंमत 0.0१ पेक्षाकमी आहे, म्हणून उच्च सामाजिक आर्थिक परिस्थिती व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संपादन प्रेरणेत लक्षणिय फरक आहे. म्हणून सदर शून्य परीकल्पना त्याज्य ठरते.

परीकल्पना क्रमांक ५ : माध्यमिक शाळांमधील उच्च व निम्न संपादन प्रेरणा असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनात लक्षणिय फरक नाही.

सारणी क्रमांक ६

उच्च व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांच्या संपादन प्रेरणेची तुलना

चल	गट	नमुना	स्वा. मात्रा	मध्यमान	प्र.वि.	टी मूल्य	पी मूल्य	सार्थकता स्तर
शैक्षणिक संपादन	उच्च संपादन प्रेरणा	२६५	४९१	६४.९७	१४.१२	६.९३	0.0000१	0.0१ स्तरावर लक्षणीय फरक आहे
	निम्नसंपादन प्रेरणा	२२८		५७.४५	८.९२			

सारणी क्रमांक ६ वरून असे लक्षात येते की, उच्च संपादन प्रेरणा व निम्न संपादन प्रेरणा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनाच्या प्राप्त टी ची किंमत ६.९३ असून, पी मूल्याची किंमत 0.0१ पेक्षा कमी आहे, म्हणून उच्चसंपादन प्रेरणा व निम्न संपादन प्रेरणा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनात लक्षणिय फरक आहे. म्हणून सदर शून्य परीकल्पना त्याज्य ठरते.

परीकल्पना क्रमांक ६ : माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक परिस्थितीत आणि खालील चलांत लक्षणिय सहसंबंध नाही.

अ) शैक्षणिक संपादन

ब) संपादन प्रेरणा

सारणी क्रमांक ७

विद्यार्थ्यांची सामाजिक आर्थिक परिस्थिती व इतर चले यांतील सहसंबंध गुणकाची लक्षणीयता

चले	नमुना	स्वा. मात्रा	'r' मूल्य	p मूल्य	सार्थकता स्तर
सामाजिक आर्थिक परिस्थितीआणि संपादन प्रेरणा	४९३	४९१	०.४२६	०.०००१	०.०१स्तरावर लक्षणीय सहसंबंध आहे
सामाजिक आर्थिक परिस्थिती आणि शैक्षणिक संपादन	४९३	४९१	०.२९८	०.०००१	०.०१स्तरावर लक्षणीय सहसंबंध आहे

माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक परिस्थितीत आणि संपादन प्रेरणा यात (r =०.४२)आणि विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक परिस्थितीत आणि शैक्षणिक संपादनात (r =०.२९८) या चलांशी ०.०१ स्तरावर लक्षणिय धन सहसंबंध आहे. म्हणून सदर शून्य परीकल्पना त्याज्य ठरते.

संशोधनाचे निष्कर्ष

१. माध्यमिक शाळांमधील मुले व मुलींच्या शैक्षणिक संपादनाच्या टी मूल्याची किंमत ०.२४५ असून, पी मूल्याची किंमत ०.०५ पेक्षा जास्त आहे, म्हणून माध्यमिक शाळांमधील मुले व मुलींच्या शैक्षणिकसंपादनात लक्षणिय फरक नाही.

२. माध्यमिक शाळांमधील मुले व मुलींच्या संपादन प्रेरणेच्या टी मूल्याची किंमत १.०९ असून, पी मूल्याची किंमत ०.०५ पेक्षा जास्त आहे, म्हणून माध्यमिक शाळांमधील मुले व मुलींच्या संपादनप्रेरणेत लक्षणिय फरक नाही.

३. उच्च सामाजिक आर्थिक परिस्थिती व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनाच्या प्राप्त टी चीकिंमत ५.३४ असून, पी मूल्याची किंमत ०.०१ पेक्षा कमी आहे, म्हणून उच्च सामाजिक आर्थिक परिस्थिती व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनात लक्षणिय फरक आहे.

४.उच्च सामाजिक आर्थिक परिस्थिती व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संपादन प्रेरणेच्या प्राप्त टी ची किंमत ९.६५ असून, पी मूल्याची किंमत ०.०१ पेक्षा कमी आहे, म्हणून उच्च सामाजिक आर्थिक परिस्थिती व निम्न सामाजिक आर्थिक परिस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संपादन प्रेरणेत लक्षणिय फरक आहे.

५ . उच्च संपादन प्रेरणा व निम्न संपादन प्रेरणा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनाच्या प्राप्त टी ची किंमत ६.९३ असून, च् मूल्याची किंमत 0.0१ पेक्षा कमी आहे, म्हणून उच्च संपादन प्रेरणा व निम्न संपादन प्रेरणाअसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनात लक्षणिय फरक आहे.

६ . माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक परिस्थितीत आणि संपादन प्रेरणा (r =0.४२) आणि विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक परिस्थितीत आणि शैक्षणिक संपादनात (r =0.२९८) या चलांशी 0.0१ स्तरावर लक्षणिय धन सहसंबंध आहे. म्हणून सदर शून्य परीकल्पना त्याज्य ठरते.

संदर्भ ग्रंथ यादी

Raju, B. (1970) School Health Programme in selected Middle Schools of Delhi: A survey, New Delhi, NCERT.

Dhanasekeran, G., (1990). A Study of Primary and Middle School Teachers regarding HealthPromotion among School Children. Mphil. Education, Madurai Kamaraj University.

Buch, M.B. (1991). Fourth survey of Research in Education. Vol-2, New Delhi: NCERT.

पंडित बन्सीविहारी, (१९९७) 'शिक्षणातील संशोधन', पुणे : नुतन प्रकाशन, प्रथमावृत्ती.

IIPS and ORC Macro (2000) National Family Health Survey (NFHS-2), 1998-99:India, IIPS, Mumbai.

Sudarshan, P.V., and Balakrishnaiah, S. (2003) Physical Education Curriculum at Lower Primary Stage – An Evaluation. Research Project, Regional Institute of Education, Mysore.

दांडेकर वा. ना., (२००४) 'शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र', पुणे : श्रीविद्या प्रकाशन, सहावी आवृत्ती.

डॉ. करंदीकर, डॉ मंगरूळकर, (२००७) 'आरोग्य शिक्षण', कोल्हापूर : फकडे प्रकाशन, दुसरी आवृत्ती.

NCERT, (2006). Sixth survey of Educational Research. Vol-1, (1993-2000).

NCERT (2005), Position Paper, National focous Group on Health and Physical Education.

Chitale. R, (2010). Statistical and Quantitative Methods, (7thed.) Pune: Nirali Prakashan.

...